पोलीस स्टेशन, तडकळस फोन:२५६८३२

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** परभणी **P.S.(ठाणे):** तडकलास
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0034 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**22/02/2025 08:37

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 21/02/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 21/02/2025
**Time From (वेळेपासून):** 12:19 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 16:04 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 22/02/2025 **Time (वेळ):** 08:21 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 007
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/02/2025 08:21 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 20 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** उप प्रादेषिक परिवहन कार्यालय प

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पठाण अजरखान अनवरखान

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1996

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | आनंदनगर, धाररोड, ,परभणी,तडकलास,परभणी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | आनंदनगर, धाररोड, ,परभणी,तडकलास,परभणी,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-7517276136

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोश नदंकुमार डुकरे | | | 1. 101, हरीप्रिया रेसिडेन्सी, , तडकलास,परभणी,महाराष्ट्र, भारत |
| 2 | मुंजा नामदेवराव मोहीते | | | 1. रा खानापुर ता जि परभणी , तडकलास,परभणी,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

दि. 22/02/2025

मी पठाण अजरखान अनवरखान, वय 29 वर्षे , धंदा रिक्षाचालक, रा.आनंदनगर, धाररोड, ता.जि.परभणी. मो.नं. 7517276136

समक्ष हजर राहुन तक्रार लिहुन देतो की, मी वरील पत्यावर माझ्या कुटंुबासह राहत असुन मी रिक्षाचालवत असुन त्यावर माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मी दोन महिन्यापुर्वी खरेदी केलेल्या रिक्षाचा पासींग कालावधी (फिटनेस सर्टिफिकेट) संपलेला असल्याने ती पासींग (फिटनेस सर्टिफिकेट रिनीव्ह) करण्यासाठी लागणारे सर्व प्रक्रिया पुर्ण केली. तसेच षासकीय फि देखील भरली होती. दि.20/02/2025 रोजी मी उपप्रादेषिक परिवहन कार्यालय, परभणी येथील श्री.डुकरे, मोटार वाहन निरीक्षक यांच्याकडे चौकषी केली. त्यावेळी श्री.डुकरे यांनी मला तेथे उपस्थित असलेले त्यांचे खाजगी मदतनीस श्री.मुंजा मोहिते यांना भेटण्यास सांगितले. त्यावर मी मुंजा मोहिते यांनी मला माझा रिक्षा पासींगचे काम करून देतो त्यासाठी श्री.डुकरे साहेब यांना 500/- रूपये दयावे लागतील असे म्हणाल्याने मला समजले की, ते मागत असलेले 500/- रुपये लाच आहे. म्हणून मी नाषिक येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागाषी संपर्क साधले वरून अहिल्यानगर, लाप्रवि येथिल पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचेषी संपर्क झाला.

त्यावरुन दि.21/02/2025 रोजी पोलीस निरीक्षक छाया देवरे मॅडम, कर्मचारी व पंच हे परभणी येथे सुरक्षित ठिकाणी आलेे. सदर ठिकाणी पोलीस निरीक्षक छाया देवरे मॅडम यांनी माझा परिचय त्यांचे सोबतचे कर्मचारी,दोन षासकीय पंचांसोबत करुन दिला. त्यानंतर मी ला.प्र.वि. अहिल्यानगर येथील पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना माझी तक्रार सांगून लेखी लिहून दिली. माझीतक्रार पोलीस निरीक्षक देवरे मॅडम, दोन पंचासमक्ष तोंडी सांगीतली तसेच माझी लेखी तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली, त्यावर मी, दोन पंचांनी व पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सहया केल्या.त्यांनतर माझ्या तक्रारीवरुन श्री मुंजा मोहिते अगर श्री डुकरे साहेब किंवा इतर कोणी माझ्या कामासाठी माझ्याकडे पुन्हा लाच मागणी करतात अगर कसे? याबाबत पडताळणी करण्याचे ठरले. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सदर पडताळणी कारवाईमध्ये व्हॉईस रेकॉर्डर वापरण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबत मला, व पंचांना माहिती दिली, तसेच पडताळणी कारवाई बाबत सुचना दिल्या.त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनीव्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे, दोन्ही पंचांचे तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे उपस्थिती बाबत निवेदन रेकॉर्ड करण्यात आले. त्यानंतरपोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिले वमुंजा मोहिते आणि श्री डुकरे साहेबयांची भेट घेण्यासाठी मला, पंच क्र.1 यांना माझ्या कडील मोटारसायकलने रवाना केले.

त्यानुसार मी व पंच क्रं 1 असे उप प्रादेषिक परिवहन अधिकारी कार्यालय, असोला जि. परभणी येथे गेलो असता त्याठिकाणी पत्राच्या चौकीमध्ये श्री डुकरे, मोटार वाहन निरीक्षक हे बसलेले होते व डुकरे साहेब बसलेल्या अगदी नजीकच असलेल्या समोरच्या खिडकी जवळ बाहेरुन मुंजा मोहिते हा उभा होता. माझी डुकरे साहेब यांचे बरोबर माझे कामासंबंधाने चर्चा झाली त्यावेळी त्यांनी मुंजा यांना माझे पेपर चेक केले का असे बोलुन मला पेपर बाबत विचारले. त्यावेळी मी पेपर देवु का असे म्हणालो असता डुकरे साहेबांनी मला हाताचे इषा-याने मुंजाकडे जाण्यास सांगीतले. मी बाहेर निघुन डुकरे साहेबाचे समोरील खिडकी जवळ उभा असलेला मुंजा यांना भेटुन माझे हातातील अॅटोचे कागदपत्रे दिले. त्यावर मुंजाने नंबर प्लेट बाबत बोलणे करीत कागदपत्रे पाहिले. त्यावेळी मी त्याला "इसका



Scanned with OKEN Scanner

क्या है"विचारले असता त्याने पाच रुपये असे म्हणाला, त्यावर मी त्याला पाच हजार क्या असे म्हणालो असता मुंजा याने "पाच सौ रुपये" असे स्पश्ट म्हणाला. मग त्यावेळी मी डुकरे साहेबाच्या समोरच मुंजा यांना मी शंभर दोनषे रूपये कमावतो पाचषे रूपये कुठुन आणु असे म्हणालो.

त्यानंतर मी परत सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी आलो. सदर बाबत मी व पंच क्र. 01 अषांनी पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांना माहिती दिली, तसेच पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी पंचांसमक्ष व्हॉईस रेकॉर्डरमध्ये रेकॉर्ड झालेले संभाशण ऐकले.त्यावरुन मुंजा मोहिते यांनी माझ्याकडे माझ्या रिक्षाचा पासींग कालावधी (फिटनेस सर्टिफिकेट) संपलेला असल्याने ती पासींग (फिटनेस सर्टिफिकेट रिनीव्ह) करण्यासाठी मुंजा यांनी डुकरे साहेबांकरीता म्हणुन पाचषे रूपये लाचेची मागणी केली. डुकरे साहेब यांनी मला मुंजा यांना भेटण्यास सांगुन त्याचेकरवी माझे अॅटोचे कामासाठीलाचेची मागणी करण्यास मुंजा यांना प्रोत्साहन दिल्याचे निश्पन्न झाले.

त्यानंतर मुंजा मोहिते व श्री डुकरे साहेब यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजीत करण्याचे ठरले. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सापळा कारवाईमध्ये अॅन्थ्रासीन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिवा वापरण्यात येणार असुन त्याबाबत पोकॉ गायकवाड यांनी मला व पंचांना उजेडात व अंधारात प्रात्यक्षिक करून दाखविले.त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांचे सुचनेवरुन 500/- रुपये माझ्या बचतीतील हजर केले. त्यात 100 रुपये दराच्या 05 भारतीय चलनी नोटा मी हजर केल्या, त्यानंतरसदर नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले व सदर नोटांवर अॅन्थ्रासीन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या षर्टच्या डाव्या बाजुच्याखिषात ठेवली. त्यानंतर मलाव पंचांना सापळा कारवाई बाबत पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी व्हॉईस रेकॉर्डरमध्ये नवीन मेमरीकार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझ्याकडे दिला.त्यानंतर मला व पंच क्र. 1 यांना मुंजा मोहिते व श्री डुकरे साहेबयांची भेट घेवुन 500/- रुपये लाच रक्कम देण्यासाठी माझ्याकडील मोटारसायकलने रवाना केले. आमचे मागोमाग सापळा पथक आले. उप प्रादेषिक परिवहन अधिकारी कार्यालय, असोला जि. परभणी येथे गेल्यावर मुंजा मोहिते यांच्या जवळ गेलो. पंच क्रं 01 देखील माझ्या सोबत सदर ठिकाणी येवुन थांबले. त्यावेळी परमीट होल्डर बाबत माझी डुकरे साहेबासोबत चर्चा झाली. त्यानंतरने तेथेच उभ्या असलेल्या मुंजा यांना भेटुन माझ्या कामाबाबत चर्चा झाली. चर्चेदरम्यान मुंजा मोहिते याने मला कित्ते है असे विचारल्यावरुन मी "देखो ना कित्ते है... पाचसौ हे ना, तुमने जित्ते बोले उत्ते दिया ना मै , साहब मंगेगे नईना फिर मेरे को" असे म्हणून 500/-रूपये लाचेची रक्कम मुंजा मोहिते यांना दिली.आमच्यातील चर्चा जवळच बसलेले श्री डुकरे हे षांतपणे ऐकत होते.मुंजानेती लाच रक्कम स्विकारून त्यांच्या अंगावरील षर्टच्या खिषात ठेवत त्याने नही नहीमै हु ना असे म्हणाला. त्यावर मी त्याला डुकरे साहब को कर लेता ना बात असे म्हणता त्याने वो बात नही करते ,टेंषन नही हो जाएंगा असे म्हणुन असे जाण्यास सांगीतले. त्यानंतर मी मला ठरवुन दिलेला लाच रक्कम स्विकारले बाबतचा डावा हात डोक्यावरुन फिरविण्याचा नियोजीत इषारा मुंजा मोहिते यांच्या जवळून थोडे दूर जाऊन सापळा पथकास केला असता बाजुला आडोशाला उभे असलेले पोलीस निरीक्षक देवरे मॅडम व सापळा पथक सदर ठिकाणी आले.तेथे मुंजा मोहिते यांना लाच रकमेसह रंगेहाथ पकडले व बाजुला चौकीत हजर असलेले लोकसेवक श्री डुकरे साहेबयांना देखील ताब्यात घेतले. पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी माझ्याकडुन व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेवुन तो बंद केला.

तेव्हा पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी स्वतःचा परिचय देवुन मुंजा मोहिते यांना त्यांचे पुर्ण नाव, पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव मुंजा नामदेवराव मोहिते वय 28 वर्श व्यवसाय पीयुसी सेंटर रा. खानापूर ता.जि. परभणी असे सांगितले. तसेच डुकरे साहेब यांना देखील पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी त्यांचे पुर्ण नाव, पद व पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव संतोश नंदकुमार डुकरे, वय-42 वर्षे, पद- मोटार वाहन निरीक्षक, उप प्रादेषिक परिवहन कार्यालय, असोला ता.जि.परभणी राहणार 101, हरीप्रिया रेसिडेन्सी, पंचगंगा तालीम समोर , शुक्रवार पेठ, कोल्हापुरअसे सांगितले.त्यानंतर मुंजा मोहिते यांचे ताब्यातुन हस्तगत करण्यात आलेली लाच रक्कम सापळा कारवाई पुर्वी लिहुन घेण्यात आलेल्या नोटांच्या नंबरषी पंचासमक्ष पडताळुन पाहीले असता ते तंतोतंत जुळल्याची खात्री झाली.

त्यानंतर पोलीस निरीक्षक देवरे मॅडम यांनी लोकसेवक डुकरे व मुंजा मोहिते यांना सोबत घेवुन पुढील कामाकाज कामी ते सावली शासकिय विश्रामगृह, परभणी येथे आले. त्यांचे सुचनेप्रमाणे मी देखील तेथे हजर झालो.पोलीस निरीक्षक देवरे मॅडम व सापळा पथक यांनी त्यांचे त्या ठिकाणी पुढील कामकाज केले.

तरी दिनांक 21/02/2025 रोजी 12:19 ते 16:04 चे दरम्यान उप प्रादेषिक परिवहन कार्यालय असोला ता.जि.परभणी चे आवारामध्ये लाचमागणी पडताळणी कारवाई दरम्यान मुंजा मोहिते यांनी माझ्याकडे माझ्या रिक्षाचा पासींग कालावधी (फिटनेस सर्टिफिकेट) संपलेला असल्याने ती पासींग (फिटनेस सर्टिफिकेट रिनीव्ह) करण्यासाठीडुकरे साहेबांकरीता म्हणुन पाचषे रूपये लाचेची मागणी केली. डुकरे साहेब यांनी मला मुंजा यांना भेटण्यास इषा-याद्वारे सांगुन त्याचेकरवी माझे अॅटोचे कामासाठीलाचेची मागणी करण्यास मुंजा यांना प्रोत्साहन



Scanned with OKEN Scanner

दिले आहे. त्यावरून करण्यात आलेल्या सापळा कारवाई वेळी उप प्रादेषिक परिवहन अधिकारी कार्यालय, असोला, जि. परभणीचे आवारामध्ये मुंजा मोहिते यांने माझेकडुन 500/- रूपये लाच रक्कम स्विकारली.खाजगी इसम मुंजा मोहिते याने माझ्याकडून अनधिकृतपणे 500/- रुपये लाच मागणी करून लाच स्विकारत असल्याबाबत लोकसेवेक संतोश डुकरे साहेब यांना माहित असतांना देखील त्यांनी खाजगी इसम मुंजा मोहिते यास लाच स्विकारण्यासाठी कोणताही प्रतिकार न करता प्रोत्साहन दिले म्हणून वरील दोन्ही आरोपीतांविरुध्द माझी कायदेषिर फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Gajanan Kaloba More(I (Inspector)) / API **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. ताडकळस
ता.पूर्णा जि.परभणी



Scanned with OKEN Scanner